श्री.

गजेंद्रमोक्ष.

यावर

प्राकृत पद्यबद्ध

मुक्त नागनामक ग्रंथ.

लक्ष्मणशास्त्री दांते नाशिककर यांणी नवीन रचून
, रा० रा० नरसो बाबूराव भिडे सातारकर
व रा० रा० सोनाजी मोरेश्वर वकील नाशिककर.

यांच्या मदतीने...

मुंबईंत

गणपत कृष्णाजी यांचे छापखान्याचे मालक आत्माराम
कान्होबा यांजकडून छापविला.

आवृत्ति १.

शके १८०१ सन १८७९.

हा ग्रंथ सन १८४७ चा आक्ट २० व सन १८६७ चा
आक्ट २५ प्रमाणे रजिष्टर केला आहे.

श्री

अथगजेंद्रमोक्षप्रारंभ

श्रीगणेशायनमः ॥ हंसततनुसख्याशींबोलतांप्रेमकारी व्रजवधुजननेऊंइच्छिकांमाब्धिपारीं ॥ कृतिजशितशिजीर्णेभक्तलोकांसितारी यदुकुलजमुरारीगोकुळींकारभारी ॥ १ ॥ कमलोपेमानतुझियापदयुग्मा कमलाकरेंकरितिमर्दनसीमा ॥ कमलादिकेंकरुनिपूजननेमा कमलोद्भवादिगमतीबहुप्रेमा ॥ २ ॥ सर्वोपरीज्यांतनसेचिसोय संसारतोभव्यकरीचहोय ॥ देईलसद्बुद्धिविभूचत्याला स्वकीर्तिचारित्र्यवदावयाला ॥ ३ ॥ अनुपहातेंकरितोसिज्यावरी तोपावतोसद्गुरुजीसत्यापरी ॥ सच्छास्त्रयोगाख्यखरीमहातरी मिळेतशीभक्तिमहासुधांझरी ॥ ४ ॥ असोनिभूदेवसभेसिधर्म भागीरथी

---

१ कामसमुद्र २ कमलतुल्य ३ ब्रह्मादि ४ नौका ५ अमृतप्रवाह ६ ब्राह्मण ७ धर्मराज. ८ भिष्मासि

जासिपुसेस्वधर्म ॥ दुःस्वप्ननाशासिउपायचोक्ष[1] सांगी
तलात्याणिगजेंद्रमोक्ष ॥ ५ ॥ त्रिकूटतोपर्वतमेरुपुत्र
जोसर्वचित्रा[2]सिअसेअमत्र[3]॥त्याचेमणीशृंगितळेंपवित्र हं
सासिजेंस्वर्णमृणालसत्र[4] ॥६॥ दीर्घविस्तृतसखोलतळेंतें
वेष्टिलेंकमलविष्किरें[5]जातें॥मंदशीतळसुगंधिजनातें तृप्त
वातकरितोनजवातें ॥ ७ ॥ कल्लोल[6]उल्लोलह्मणूनिजाती
आकाशपर्थापसरोनिधांती ॥ननीलिमाभूतचतुष्टयाला
स्वशक्तिनेंकायपुसावयाला ॥८॥ घेतांबरोबरसुनिर्मळप
यराशी ज्याचेतरंगउडतांगगनांगनाशीं॥देशांतरींजरिव
सेनरिमित्रमुख्य भेटीशिजातिगमतेंमजभूतसख्य॥९॥प
डोनिभंगांवरिभंगनाद मयूरतेजाणतिमेघनाद॥विस्तारु
नीपंखकरूननाद तारावरीनाचतिकंप्रपाद ॥ १०॥ कम
ळींकमळींसंपीतिकेली भ्रमरीशींकरितं.तशाचिवेळीं॥म
करंदपिवोनिमत्तहोती कमळींबैसुनिभृंगगुंजे[11]ाती ॥११
कमलांतलारसपिवोनिभलीतां भैसलालिगानबहुचारु

---

१ निर्मल २ आश्चर्यास ३ पात्र ४ सुवर्णकमलाच्याबिसतंतूचे मत्र ५ पक्षिसमूह ६ चंचल ७ तृप्तहोती ८ लहरी ९ चंचल १० तुल्य- पात्र ११ गुंजारव १२भ्रमरपंक्ति.

त्रिभातीं॥ लहरीनेंटनटुनिवांद्यपणेंही कमलालयालय ह्मणोनितिन्हींहीं॥१२॥सप्रेमहंसवदनींबिसभारघेतो हंसीसगर्भतिसजाठरपूर्तिलातो ॥ देऊनिशेषउरल्यावरितेचखातो संचारफारनिकटींअसतांकरीतो ॥१३॥ लाजतेह्मणुनिचंचुपुटातो पस्नवोनिबिसचर्वितदेतो॥ फारउष्णतरिपद्मदळानें छादितोअधिकपक्षपुटानें ॥ १४ ॥गंधर्वहाहागजराजनावें बरोबरीघेउनिदिव्यछावे॥तृषार्तवारीमृगणार्थधांवे तशामधेंत्यासरसीसपावे ॥ १५॥ फिरतांतळ्यांतशिरतांचकरीतो अतिनिर्मलोदकसतृष्णपितोतो॥इतुक्यामधेंजलगनक्रबळानें चरणींधरीगजपतीसरदानें॥ १६॥ अतिकठिणजयाचेंउष्णत्याग्रीष्मकाळीं गजगजिनिशिशूंसीप्राप्तकासारपाळीं॥ अतितृषितह्मणोनीप्राशितांभूरिपाणी विधृतचरणनक्रींजाह्लादीनवाणी ॥ १७॥ झटतझटतहोताफारसानक्रतोंडीं चरणधरणसोडूंइच्छितांत्यासिकोंडी॥जबरमिठितयाचीपाहतांगुंगलाहो मगपरिधरिबंधूबांधवांचाचिलाहो॥१८॥

१ प्रातःकाळीं २ नृत्यकरी ३ वाद्यरूपानें ४ उदक ५ शोधनार्थ ६ सरोवरास ७ दंतानें ८ सरोवराच्याकांठीं ९ पुष्कळ.

करिणिपरितयालापाहतांदीनदीन तरुणसुतपरीतेमागुते लीनलीन॥समजरिकरिहोतेहोपुढेमीनर्मानें प्रतिदिशिंन चकोणीपाहिलापीनंपीन ॥ १९ ॥ माझेंभोजनझालि यावरिसदाजीभोजनातेंकरी उष्णींमीअसतांकदापिन ढळेइच्छूनिछायातरीं ॥आरण्यींपडतांचुकामुकफिरेत्या त्यादरीकंदरीं नक्रग्रस्तगजेंद्रयापरिकरींचितेंसिचित्तांत रीं ॥ २०॥ अन्यकामिनिकडेनिजराणी पाहतांदिसत सेकिलवाणी॥हेंमनींअणुनिजोडिमिपाणी तीअसोह्मणु नियांतिचिबाणी ॥ २१ ॥ चरतांवनांतरिंशिशूविसरा वा दरिकंदरींतरिफिरेकरिरावा॥मिळतांफिरोनिबहुधास मजावा कथितोअसादिवसहीमजयावा॥२२॥ रागटा कुनिशिंशूखुषहोतां सोंडसोंडफिरवीहलवीतां ॥ पुच्छ मीह्मणतसेंनिजताता तोतसादिवसदुर्मिळआतां ॥२३॥ जेवंधुजेबांधवमानकाळीं पुढेंपुढेंभोगितिभोगपाळीं ॥ नक्रासिदेऊनिमुखानिगाळी प्रसंगतोटाळितित्याचकाळीं॥२४॥ जलचारिनक्रगजपासिजळांत गजओढितो

---

१ मीनाहींमीनाहीं २ दक्षदक्ष ३ शब्दातें ४ बालक ५ पंक्ती ६ शिवी ७ गजेंद्रासी

जलचरासिथळांत ॥ अतिकाळतेउभयताप्रधनातें क रितांबळीत्यजिननक्रगजातें ॥२५॥दीनत्यागजमुखासि पहातां छावतेकरितिरोदनपाता ॥ आंतरत्यजुनिवैरसर्पें ली इच्छितीपतिविमोचनयत्नीं ॥ २६ ॥ काह्नोअला आजमलाप्रसंग भक्षीतृणेंवासवनींअसंग॥कामादिवैरी जगतासिसाहा निर्हेतुहेगांजितिईशपाहा ॥ २७ ॥ का मजोजगविमुग्धकरीतो त्यापुढेंतृणनकायकरीतो ॥ ति त्तिरीअसुनिअग्निसपीतो रक्तरत्नदिसतांनचभीतो॥२८॥ ताराविधूंशींविधिंशींसरस्वती कुंडोदिमातापरपूरुषाप्र ती ॥ जोयोजिशास्त्रादिगुरूसिधिक्कृती करीजरीदूरतरी जगत्पती ॥ २९ ॥ कामहाप्रबलफारपुरेसा होइनाह्म णनिहोतनकोसा ॥ किल्बिषेंकरविणारविनाशा सोड वीलविभुहीमजआशा ॥ ३० ॥ क्रोधज्याहृदयिवास करीतो बंधुमित्रजनमातृपित्यातो ॥ धिक्करोनितरितप्तन होतो क्रोधयास्तवजनासिनहोतो ॥ ३१ ॥ ज्याच्या भरांतअसतांनभितोनृपाळा वेदोक्तशास्त्रगुरुशिष्टजना

१ युध्दातें २ सवत ३ चंद्रासी ४ ब्रह्मदेवासी ५ जारापासूनउत्प न्नझालेला ६ मदन ७ पापें

नकाळा ॥ आल्यातशासमयिंघातकरीनिजाचा सोसूं
शकेनजंगदीश्वरकोपजाचा ॥ ३२ ॥ चांगलीमज
सिवस्तुअसावी नित्यहेंल्हदयिंजोचअसावी ॥हीकशीभ
वनदींउतरावी लोभहाजरिअसेचखराबी ॥ ३३ ॥ तु
झीप्रसंगींस्मृतिहाअनुग्रह केलातुवांफारबराशुभावह॥
वाढेलनिःसंशयमोहदुःसह जाईलऐशीपरिकाळजीव
ह ॥ ३४ ॥ मनुष्यहाकोणह्मणेलमाला माझ्यापुढेंको
णटिकेलसाला ॥ अशापरींघालविसर्वकाळा तोमाद
सोडोमजलादयाळा ॥ ३५ ॥ अन्यासऐश्वर्यनसोअ
शाळ्ळा करोनिचित्ताप्रतिदेतसासला ॥ देतांपुढेंतेंपरि
येतसेंगळा त्यामत्सरापासुनिसोडशार्मला ॥ ३६ ॥ सा
हारिपूगांजितियापरीमला नजाणवेयास्तवसंचिताम
ला ॥प्रसिद्धजोसप्तमनक्रयाखळा मारीलमारोजरिईश्व
रीकळा ॥ ३७॥ स्तुतीकरावीपरमेश्वराची केलीतरीती
परिफारसाची॥ संतुष्टिहोतांप्रभुमानसाची सुधन्यताकै
सिनत्याजनाची ॥ ३८ ॥ नियंतजंतुशतेंतुझियाहतीं ह्म

---

१ ईश्वर २ प्रसाद ३ अंगावर ४ सांवळ्या ५ नेहमीं

णुनिदेवतुंयाजगिचापती॥ सततसोडवितादुसराकिती क रिअशाकरितोविनतीतती ॥ ३९ ॥ कलत्रतूझेंजरिलो कमाता कष्टींतुलाबोलतिधांवताता ॥ उशीरकांलावि शिबोलआतां दुजातुझ्यावांचुनिकोणपातो ॥ ४० ॥ करोनिसिद्धांतअसामनाचा नपक्षकोणासिसुल्हज्जना चा ॥ श्रीशापरेशाजगदीशनामा पुढेंकशीसंस्मृतिनाम पामों ॥ ४१ ॥ श्रीशदेवपरमेशदयाळा काढिशीघ्रतर संकटकाळा ॥ पाळिकायकरुंमीतुझिसेवा आवडेलतु जलातरिमेवा ॥ ४२ ॥ यालोकिलोकांतरिंवाशिवाय मलादुजाकोणतुझ्याशिवाय॥ समस्तजावेभगवन्नपा य ह्मणोनितूझेधरिलेचिपाय ॥ ४३ ॥ करींद्रनक्रींधरि तांसरोवरीं त्यावेळित्यासिप्रविदारणाकरी ॥ अशक्तझा ल्यावरितोपरोपरी धरीमनानेंजगदीशचाकरी॥४४ ॥दे वींतुलावागविण्यासिसत्ता हेवेदशास्त्रस्मृतिलागिपत्ता॥ कार्यीवृथाकांधरणारमत्ता खातोसिकांपुत्रकलत्रलत्ता

---

१ भार्या २ संरक्षिता ३ संसार ४ खरूज ५ शुभावहविधि
६ युद्ध ७ देवाचेठायीं ८ ममत्व

॥ ४५ ॥ तुझीअसेज्यावरिझालिशीकृपा तोकाययमानिभवासरीसृपा ॥ज्यालाघडेसख्यमहृ नरेंद्रां तोकांधरायासिभितोफणींद्रां ॥ ४६ ॥ तापत्रयह्मणुनीह्रदयाशीं आणितोजगपतीअघनाशी ॥ काढितूंसकळसंशय झाला धांवपावमजलागिदयाळा ॥ ४७ ॥ आतांकुठेजाउंकसेंकरूंमी रक्षीमलाकोणह्मणेलमीमी ॥ जगत्रयींकोणअशीअसामी ज्याच्यापुढेंजाउंह्मणूंचतोमी ॥ ॥ ४८ ॥ असोमहाशंकरतोगजारी असोमहासेनहितारकारी ॥ ह्मणूंमहानागतसानतारी खरामलारक्षिलतोमुरारी ॥ ४९ ॥ अज्ञानखाणीपशुवाशिशूवा माझीदयात्यावरिनित्यठेवा ॥ कृतार्थकेलाध्रुवतोभुकेला तसातुझामीप्रभुकांनचेला ॥ ५० ॥ पत्रपुष्पफलतोयकशानें तुष्टहोयजगजेठिजयानें ॥ हेंखरेंरुचितरीहिकशाचीयोजनाकरुंतशीचतयाची ॥ ५१ ॥ पत्रपुष्पफलतोयमुरारी घेतसेभजकदत्तकरारीं ॥ होतसेपरमतुष्टखरारी हृखरेंमनपरंतुथरारी ॥ ५२ ॥ कर्षसीह्मणुनिकृष्णतुला

---

१ सर्प २ गारोडी ३ महासर्प४समूहाला ५ कार्तिकस्वामी ६ तारकासुराचाअरी (शत्रु) ७ विष्णु ८ खरनामकदैत्याचाअरी (विष्णु

मी हाकमारितअसेंबहुप्रेमें[1] ॥ अर्थहाजरिअसेपरिनां
मीं कीर्ति[2]फारपसरेलचनामी ॥ ५३ ॥ देवातुझाआत्म
जपद्मं[3]बाण पद्मालया[4]स्त्रीतुझिरूपखाण ॥ पद्मातुंपद्मी[5]
अभिधानगाण गातोंतुझें[6]पद्मिह्मणूनिजाण ॥ ५४ ॥ ध
रोनिपायासिकरोनितांत[7] पासीमलानक्रअसाउदंत[8] ॥
क्रीडारमेसींकरितांनितांतें[9] कळेतरीदेवकरीलशांत ॥५५
पत्रेंतुळसिचेंकुठेंपाहूं श्रमहोईलजरीतरिवाहूं॥ कांळि
याफळमिळेलकसेंतें कंजं[10]अर्पुंकमळापतिलातें ॥ ५६॥
प्रियं[11]जनपरिदेतांघेइंमीआदरानें करिनतरितयाचीकृ
[12]त्स्नमुक्तीफळानें प्रियकमं[13]ळह्मणोनिजाणतांजेंकरीनें ॥
कमळविमळकोळेंफेंकिलेंपुष्करानें[14] ॥ ५७ ॥ पुंष्करी[15]ह्म
णुनिकष्टमनाला पुष्करा[16]त्मकजगज्जनकाला ॥ पुंष्करो[17]
द्भवअशासुमनाला पुष्करेंकरुनिअर्पितझाला॥५८॥तु
झ्याप्रियेचाकमळाधिवास ह्मणूनिअर्पींकमळासदास ॥

---

१ प्रेमानें २ नामांत ३ मदन ४ लक्ष्मी ५पद्मआहेज्यास (विष्णु) ६ हत्ती ७ ग्लान ८ वार्ता ९ आतिशय१० कमळ ११भक्तजन१२ समग्र १३ प्रियआहेलक्ष्मीजालाआसाविष्णु १४ शुंडेनें १५ गज १६ आकाश स्वरूप १७ जळोद्भव , कमळ)

आतांतुझीमीधरिलीचकास समस्तमाझेंतुजहोयपास ॥ ५९ ॥ अशक्तझाल्याकरिणीसुपुत्रा त्याकाळितोमानुनिकर्मसूत्रा ॥ संकष्टकाळींस्मरणासिपात्रा लक्षूनिफेंकीकमळासुपत्रा ॥६०॥ हाकमारिलिजशीचगजानी ऐकतांकमळमंदिरजानी ॥ स्थानटाकुनिउठेचनिजांनी पूसतांवचनघेइनकानीं ॥ ६१ ॥ रंगालयींरत्नसुवर्णताट रांगोळिनेंयुक्तकरोनिपाट ॥ ठेवोनियांत्यावरिभोज्यथाट त्यागीरमेचींवचनेंदहाट॥६२ ॥ जातांकुठेटाकुनिभोजनातें सांगामलाज्यास्तवत्याजनातें असेंकसेंहेंतुमचेंचिनातें गेलांमनानेंजगदीशत्यातें॥६३॥ सोडावयालागिगजेंद्रसंत्सरू घेऊनिचक्राप्रतिभीरुवापरूं॥ महीध्रभेदीमघवाजसास्वरूं अशाप्रसंगींअथवातुलाधरूं ॥ ॥ ६४ ॥ कालियागरुडहोतनकोसा जोपर्थीपडलतोचिपुरेसा ॥ कोणतेंमनतरीनुपयोगी त्यापुढेंअसुनिमीउपयोगी ॥ ६५ ॥ जायापतीवचनपीउनिफारपेय बोलावयाअवसराप्रतिवैनतेय ॥ जाणूनिदेवरथमीतुमचा

१ पसंत २ विष्णु ३ पारिवारानीं ४ दांडगी ५ प्रशस्तआयुधधरण्याचिमुष्टी ६ पर्वत ७ इंद्र ८ वज्र

शिवाय माझ्याकसेढळतितेतुमचेचिपाय ॥६६॥ न्याव बरोबरतुलागरुडाखरेंबा वेगींसुवर्णमयपक्षजशीचरेवा तूझ्यापराक्रमणिकोणकरीलहेवा नागांतकाझ्यकसें ह्मणुंयेनयेवा ॥६७॥ असोनिनागांतकदेवयेतों नयेंअसे बोलततार्क्ष्यकेतो ॥ सदासमीपींजरिमीहिशेष जाणातु ह्मींबोलनपिष्टपेष ॥ ६८ ॥ असेतुझेबोलविचारितांम नीं खरेबरेहोतिलसर्वथाजनीं ॥ जेथेंअसेतोगजराज त्यातळीं येवेंनतेयांजरियेशियापळी ॥ ६९ ॥ तार्क्ष्या सर्नीवसुनिदेवअलातटाकीं येतांउडीजलदिनेंसरसींत टाकी ॥ पाणिस्थभास्वरकरोनिविमुक्तचक्र केलाद्विभा गमुखिसोडुंनिनागनक्र ॥ ७० ॥ हाहाहुहूदेवसभेसिगा तां आह्मांमधेकोणवरिष्ठआतां ॥तूंसांगहेंऐकुनिदेवपाता ऋषींतुह्मांलाप्रतिवाक्यदाता ॥ ७१ ॥ ध्यानस्थतोदेव लवोलजेव्हां नदेहहाहूहुअतीवतंद्रां ॥ कोपासिजाती मुनिकोपमुद्रा करोनिशापील्यजिसर्वतंद्रां ॥ ७२ ॥ हो नक्रहातूंगजवारिचारी अरण्यचारीमदमत्तभारी ॥ हु

---

१ नर्मदा २ पराक्रमांत ३ पिष्टपेषण ४ गरुडा ५ गरुडावर ६ सरांत ७ सोडवुनि ८ आळस ९ उदकसंचारी

42216

ष्कर्मभोगीनहिजीवथारीं पडेलयेणेंपरिकाळसारी ॥
॥ ७३ ॥ येणेंपरीदेवलवाक्यकानीं पडेपडेतोहुहुदिव्य
गांनी ॥ तथैवहाहाजरिफारमानी क्षमाह्मणेदेवलहेनमो
नी ॥ ७४ ॥ कृपामृदूदेवलदेवगायका ह्मणेतुह्मीवाक्य
मदीयआइका ॥ संकष्टकाळींस्तवितांजनार्दना संपन्न
होवोतुमचीमहार्दना॥७५॥ ऐकूनिऐसेंऋषिवाक्यत्याव
री ठेवोनिहानिश्चयफारत्यावरी ॥ येतांतसावेळकरूनि
त्यापरी गेलेस्वरूपामिळवोनितेघरीं ॥७६॥गंधर्वनामेंग
जराजहाहा नक्रास्यपासावनिमुक्तपाहा ॥केलीपरेशीं
झणित्याचिचाहा तोतूमचीदूरकरीलहाहा ॥७७॥ देवा
तुझेंनामअवश्यघ्यावें तसेंनझालेंह्मणुनीचपावे॥हाहास्व
नामासिअसेनआता जगींतुझ्यावांचुनिकोणपोता॥७८
संगीतशास्त्राभ्यसनीविदग्धं हाहाहुहूदेवलशापदग्ध ॥
होतांतुझेतेचरणींप्रसक्त ह्मणोनिझालेपरिघोरमुक्त॥७९
शालिवाहनशकेअठराशे अब्दनामबहुधान्यखरेंसें ॥

---

१ गंधर्व २ प्रार्थना ३ नक्रमुखापासून ४ सर्वेश्वरानें ५ संरक्ष
णकरिता ६ चतुर ७ संवत्सर

मुक्तनागभगवच्चरणाला ग्रंथलक्ष्मणकवीअरपीला ॥
॥८०॥ मातापितायाकविलक्ष्मणाची अंबाजगन्नाथह्मणू
निसाची॥उपाढ्वदांतेगजमोक्षिजोधणी त्याकृष्णनाथा
सिनमेक्षणोक्षणीं ॥ ८१ ॥ ॥इतिदांतेइत्युपनामकल
क्ष्मणकविकृतमुक्तनागाख्यगजेंद्रमोक्षस्तवसंपूर्ण ॥